पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे -१८, कायदा विभाग
क्र.-कास/६/कावि/४५० /२०२२
दिनांक - ३०/११/२०२२

विषय – विहीत मुदतीत कायदेशीर बाबींची पूर्तता करणेबाबत......

परिपत्रक

कायदा विभाग व महापालिकेतील इतर विभाग यांच्यात समन्वय साधून कायदेशीर बाबींना विहीत मुदतीत पूर्ण करणेकामी पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत –

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अखत्यारीत विविध विषयास अनुसरुन महापालिकेकडून किंवा महापालिकेविरुध्द वेगवेगळे न्यायालय / लवाद / प्राधिकरण इ. यांच्यासमोर दावे दाखल केले जातात. तसेच नानाविध वादास अनुसरुन कायदेशीर नोटीसाही महापालिकेस तक्रारदारांच्या वकिलांमार्फत दिल्या जातात. सदर विषय हे कायदेशीर असून दावा / तक्रार/ नोटीसची सूचना प्राप्त झाल्यापासून त्याला मुदत अधिनियम, १९६३ मधील तरतूदीन्वये विहीत मुदतीत त्यावर योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक असते. सदर प्रकरणात महापालिकेची बाजू मांडण्यासाठी कायदा विभागाकडून मनपा पॅनलवर असलेल्या विधीज्ञ वकिलाची नियुक्ती केली जाते. तसेच तदनुषंगिक वादाबाबतच्या सूचना कायदा विभागास प्राप्त झाल्यावर कायदा विभागाकडून संबंधित विभागास दावा दाखल झाल्याचे कळवून दाव्याची / नोटीसची प्रत पत्रासोबत जोडून सविस्तर परिच्छेदवार अहवाल त्वरीत मागविला जातो. परंतु असे निदर्शनास आले आहे की संबंधित विभागाकडून विहीत मुदतीत माहिती पुरविली जात नाही व मनपा पॅनल वकिलांशी कोणताही संपर्क केला जात नाही. त्यामुळे संबंधित विभागाकडून पाठपुरावा करुन माहिती गोळा करताना योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्याने कायदा विभागाच्या बहुमूल्य वेळेचा अपव्यय होतो व ब-याच वेळा अंतिम मुदत उलटून गेल्यामुळे महापालिकेला अनावश्यक कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागते.

२) कायदेशीर विषयात केली जाणारी दिरंगाई व निष्काळजीपणा या बाबी गंभीर स्वरुपाच्या असून सर्व विभागांनी त्यावर स्वयंप्रेरणेने विचार करणे आवश्यक आहे. तरी महापालिकेतील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांनी कायदा विभागाकडून सूचना प्राप्त झाल्यावर कटाक्षाने लक्ष देऊन कायदेशीर बाबींना प्रथम प्राधान्याने, विहीत मुदत ओलांडण्याची वाट न पहाता त्यावर त्वरीत बिनचूक कार्यवाही करावी.

३) विविध विभागांकडून कायदा विभागात कायदेशीर अभिप्राय घेणेकामी नस्ती पाठविल्या जातात. परंतु त्यात विभाग प्रमुखाचे स्पष्ट मत मांडले जात नाही त्यामुळे नेमका कोणत्या मुद्द्यावर अभिप्राय हवा आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे प्रस्ताव सादर करताना विभाग प्रमुखांनी ज्या विषयात अभिप्राय हवा आहे त्याबाबत स्पष्ट प्रस्तावासोबत आपले मत मांडावे.

Scanned by CamScanner

४) विविध विभागांकडून करारनामा तपासणीकामी पाठविले जातात. परंतु ब-याच वेळा त्यासोबत कोणतीही माहिती अथवा नस्ती पाठविली जात नसल्यामुळे करारनाम्याचे स्वरुप समजण्यात अडचण निर्माण होते. तरी करारनाम्यासोबत कामाबाबत पूरक माहिती, नस्ती व करारनाम्यावर विभाग प्रमुखांनी स्वाक्षरी करावी.

तरी या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

**प्रत – सर्व विभाग**

Scanned by CamScanner